**निशाणी क्र. ३२**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. ९ (PW–9) यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करते की,

नाव – जया विलास काटकर

वय – ४४ वर्षे, व्यवसाय – पोलीस पाटील,

राहणार – नांदुरा, तालुका नांदुरा, जिल्हा बुलढाणा

– – – – –

**<u>सरतपास सरकारी अभियोक्ता श्री.व्ही एम बापट यांच्यामार्फत</u>**

१. दिनांक २७/०७/२००८ पासून मी नारायणपूर या गांवची पोलीस पाटील या पदावर कार्यरत आहे. विष्णू आत्माराम खैरे हे आमच्या गांवातील आहेत. त्यांच्या पत्नीचे नांव वर्षा होते. घटना दिनांक २८/०५/२०२१ रोजीची आहे. मी घरी होते. त्यावेळी आरोपीचे वडील माझ्या घरी आले आणि त्यांनी मला सांगितले की, आरोपीने त्यांच्या सुनेला मारहाण केली आणि ती घरात पडलेली आहे. मी आणि माझे पती असे दोघेही घटनास्थळी गेलो. वर्षा ही घरात पडलेली होती आणि तिच्या डोक्याला जखम होती. रक्त खाली सांडलेले होते. आरोपी विष्णू हा त्यावेळी घरातच होता. मी नाईकनवरे ठाणेदार साहेबांना फोन लावला. ते आले आणि त्यांनी तेथे पंचनामा केला. बॉडी पोस्टमार्टमला नेली. वर्षाचा मृत्यू तिला मारझोड झाली होती त्यामुळे झाला. माझे पोलीसांनी बयान घेतले नव्हते. मी विष्णू खैरेला ओळखू शकते. तो व्ही.सी. स्क्रीनवर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपासणी आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जे. डी. तायडे यांच्यामार्फत</u>**

२. हे खरे आहे की मी घटनास्थळी गेले तेव्हा घटना घडून गेली होती.

हे खरे आहे की घटना कशी घडली आणि काय घडली हे मला माहीत नाही. ती वेळ पाच–साडेपाचची होती. नक्की आठवत नाही. मी ऐकीव माहितीच्या आधारे घटनेबद्दल पोलीसांना सांगितले. हे खरे नाही की पोलीस पाटील असल्याने मी पोलीसांच्या सांगण्यावरुन कार्यवाही करते. हे खरे नाही की मी घटनेविषयीच्या खोट्या ऐकीव माहितीच्या आधारे साक्ष देत आहे. हे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत.

DISTRICT COURT, MAHARASHTRA
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.04.01 18:07:27 +0530

मलकापूर. **(सं.वि. जाधव)**
दिनांक – ०१/०४/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मलकापूर.

वाचून दाखविले, बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत दुपारी १२.१४ वाजता सुरु करुन दुपारी १२.२५ वाजेपर्यंत नोंदविण्यात आला.)

DISTRICT COURT, MAHARASHTRA
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.04.01 18:07:32 +0530

मलकापूर. **(सं.वि. जाधव)**
दिनांक – ०१/०४/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मलकापूर.

साक्षीपुराव्याची प्रत मिळाली.

| | |
|---|---|
| सरकारी अभियोक्तांची सही | |
| साक्षीदाराची सही/अंगठा | |
| आरोपींच्या वकीलांची सही | |